# प्रकरण पहिले

# प्रस्तावना

## १.१) प्रास्ताविक:—

सदरील संशोधन प्रबंध हा महाराष्ट्र विधानसभेमध्ये राखीव असलेल्या SC व ST साठीच्या जागा, त्यांची निवडणूक पध्दती व त्या पध्दतीचा त्यांच्या कार्यावर होणारा परिणाम आणि खाजगी आरक्षण देण्याच्या उद्देशावर व त्यांच्या सहसंबंधावर प्रकाश टाकतो. राजकीय आरक्षणाची मागणी आज समाजातील अनेक गटांमधून होत असल्यामुळे या राजकीय आरक्षणाचे आज ६० वर्षानंतर परीक्षण करणे गरजेचे वाटते. टिकाकार असे म्हणतात की, भारतातील आरक्षण व्यवस्थेला ६० वर्षे उलटूनही दलितांचे अपेक्षित असे सामाजिक, राजकीय, आर्थिक जीवनमान सुधारलेले नाही. हा प्रबंध दलितांच्या शैक्षणिक विकासावरती सुध्दा प्रकाश टाकतो. सदरील प्रबंधामध्ये महाराष्ट्र विधानसभा निवडणूक १९९९ व २००४ मध्ये अनुसूचित जाती साठी आरक्षित असलेल्या मतदार संघातून (केज, धारावी, नागपूर (उ) आणि जत) विधानसभेमध्ये निवडून आलेल्या आमदारांनी केलेल्या भाषणांचा अभ्यास केलेला आहे, आणि २००९ च्या निवडणूकीत आरक्षित असलेला उदगीर मतदार संघ व आरक्षीत नसलेले अहमदपूर व खेड मतदारसंघातील दलितांची सामाजिक, राजकीय, शैक्षणिक विकासाचा आढावा घेण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रबंधामध्ये दलितांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि शैक्षणिक परिस्थितीचा आढावा घेतला आहे. या प्रबंधामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित जातीसंस्थेचे उच्चाटन हा मध्यवर्ती व प्रमुख प्रबंध म्हणून वापरला आहे. या प्रबंधामध्ये बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेले राजकीय आरक्षण आणि सद्या त्यांची होत असलेली अमंलबजावणी यांचा आढावा घेतला आहे.

प्रस्तुत प्रबंध लेखनासाठी प्रामुख्याने गोपाळ गुरू, आनंद तेलतुंबडे, गेल ऑमवेट आणि सुखदेव थोरात यांच्या लेखन साहित्याचा आधार घेतला आहे. या प्रबंधामध्ये प्रामुख्याने राजकीय आरक्षण आणि दलितांची आर्थिक व शैक्षणिक परिस्थितीचा विकास याचा पडताळा केला आहे. अमर्त्य सेन आणि मिचेल लॉबवीज यांच्या विकास विषयक धोरणांचा दलित विकासाशी ताळमेळ घातला आहे. राजकीय प्रतिनिधीत्वाचा दलित विकासातील योगदानाचा आढावा घेतला आहे.

आज राजकीय आरक्षण हा चर्चेचा विषय बनला आहे. राजकीय आरक्षण हे भारतामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळापासून अस्तित्वात आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताच्या राज्यघटनेमध्ये याचा समावेश करण्यात आला आणि दलितासांठी (SC, ST) विधानसभा आणि लोकसभा यात राखीव जागा देण्यात आल्या. परंतु ६० वर्षे ओलांडल्यानंतर सुध्दा याचा परिणाम समाधानकारक दिसत नाही. या प्रबंधामध्ये खरोखर राजकीय आरक्षणामुळे दलितांचा अपेक्षित असा सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि शैक्षणिक

विकास घडू शकला आहे का? याचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

या प्रबंधामध्ये ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेत असतांना प्रामुख्याने १९३२ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि म. गांधी यांच्यातील पुणे करार याचा विचार केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली होती. परंतु म. गांधी यांना ती मान्य नव्हती त्यांच्या मते असे केले तर देशाचे विभाजन होईल म्हणून ते आमरण उपोषणाला बसले शेवटी बाबासाहेब आंबेडकर व म. गांधी यांच्यात पुणे करार होऊन दलितांसाठी राखीव जागा देण्याचे ठरले. हेच धोरण भारताच्या राज्यघटनेमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.

या प्रबंधामध्ये बाबासाहेबांच्या आरक्षण विषयक धोरणाचे विश्लेषण त्यामागची विचारप्रणाली याचा आढावा घेतला आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र विधानसभेमध्ये शिक्षकांसाठी असलेल्या स्वतंत्र मतदार संघ व्यवस्था व SC, ST साठी असलेल्या राखीव जागा याचा तुलणात्मक अभ्यास केला आहे आणि राजकीय आरक्षणाची सद्यस्थिती व भविष्यकालीन वाटचाल कशी असायला हवी याचेही विचारमंथन केले आहे.

## १.२) संशोधन विषय:—

''राजकीय आरक्षणाचा टिकात्मक अभ्यास'' विशेष संदर्भ: महाराष्ट्र विधानसभा निवडणूक १९९९ आणि २००४.

## १.३) कार्यात्मक व्याख्या:—

१. राजकीय आरक्षण:— विधानसभा व लोकसभा यात SC, ST साठी राखीव असलेल्या जागा.

२. टिकात्मक:— चिकित्सक, सखोल

३. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक १९९९ आणि २००४ :— महाराष्ट्र विधानसभेवर १९९९ आणि २००४ च्या निवडणूकीत केज, धारावी, जत आणि नागपूर (दक्षिण) मधून निवडून गेलेले आमदार.

## १.४) संशोधनाचे महत्व:—

वसाहत कालीन भारतापासून ते आजतागायत दलित विकासाचे एक साधन म्हणून राजकीय आरक्षणाकडे पाहिले जाते. शेकडो वर्षे समाज प्रवाहापासून वंचित राहिलेल्या जातींना समाजप्रवाहात आणण्यासाठी त्यांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक विकासासाठी त्यांना निर्णय निर्धारणामध्ये पुरेसे प्रतिनिधित्व मिळावे म्हणून राजकीय आरक्षणाचे धोरण स्वीकारले गेले. अमर्त्य सेन यांच्या मते, '' समस्यावर योग्य उपाय तोच करू शकतो ज्याने त्या समस्या भोगल्या आहेत.'' म्हणून, जर दलितांच्या समस्या सोडवायच्या असतील, त्यांना मुख्य प्रवाहात आणायचे असले तर धोरण निश्चितीमध्ये त्यांचा सहभाग असणे गरजेचे होते. परिणामी देशपातळीवर लोकसभा, राज्यपातळीवर विधानसभा यात SC, ST साठी राखीव जागा देण्यात आल्या.

कायदेशिररीत्या दलितांना लोकसभा आणि विधानसभा यात प्रतिनिधित्व मिळाले पण आज ६०वर्षे उलटल्यानंतर खरोखर राजकीय

आरक्षणामुळे दलितांचा सामाजिक, राजकीय, आर्थिक विकास झाला आहे का? दलित प्रतिनिधी दलितांच्या विकासासाठी प्रयत्न करतात का? दलितांचे मागासलेपण दूर झाले आहे का? दलित प्रतिनिधीत्व दलितांच्या समस्या सोडवण्यात यशस्वी ठरले आहे का? आज राखीव मतदार संघातील दलितांची सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक परिस्थिती कशी आहे? दलितांकडे त्यांची स्वत:ची उत्पादनाची साधने उपलब्ध करूण देण्यात दलित प्रतिनिधित्व यशस्वी ठरले आहे का? दलित समाजाचे आर्थिक परावलंबन संपले आहे का? या व यासारख्या अनेक प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी हा अभ्यास विषय महत्वाचा ठरला आहे. आजपर्यंत या विषयावर स्वतंत्रपणे संशोधन झाले नसल्यामुळे हा विषय अभ्यासासाठी निवडला आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी प्रामुख्याने ३ मतदार संघाचा अभ्यास केला आहे. मराठवाडा हा मागासलेला भाग म्हणून समजला जातो म्हणून मराठवाडयातील उदगीर मतदार संघ हा २००९ मध्ये राखीव करण्यात आला. म्हणून हा मतदार संघ अभ्यासासाठी निवडला होता. त्याचप्रमाणे समान भौगोलिक परिस्थिती असलेला विनाआरक्षित मतदार संघ म्हणून अहमदपूर या मतदार संघाची निवड केली व भिन्न भौगोलिक परिस्थिती आणि विकसीत मतदार संघ म्हणून पुणे जिल्हयातील खेड या विनाआरक्षीत मतदार संघाची निवड केली व या तीनही मतदार संघातील खुला गट व राखीव गट या दोन्ही गटाचे सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक विकास, दर्जा जानून घेतला आहे. यासाठी हा प्रबंध महत्वाचा ठरतो.



Jayakar Knowledge Resource Centre
SPPU, Pune

## १.५) अभ्यासाची उद्दिष्टये:—

१. राजकीय आरक्षणाचा दलितांवर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

२. आरक्षित मतदार संघातील दलितांचा सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक विकासाचा आढावा घेणे.

३. आरक्षित मतदार संघातून निवडून आलेल्या आमदारांनी विधानसभेत केलेल्या भाषणांचा अभ्यास करणे व ते कोणत्या धोरणाची मागणी करतात ते अभ्यासणे.

## १.६) गृहितके:—

१. अनुसूचित जातीला राजकीय आरक्षण देऊनसुध्दा त्यांचा अपेक्षित असा सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि शैक्षणिक विकास झालेला नाही.

२. राजकीय आरक्षणामुळे दलित जातींमध्ये जातवार गटबाजी होते व दलितांमधील एकता लोप पावते.

३. सद्याच्या राजकीय आरक्षणामुळे अनुसूचित जातीच्या मताचे मुल्य शुन्य होते.

४. अनुसूचित जातीसाठी आरक्षित असलेल्या मतदार संघातून निवडून गेलेले आमदार अनुसूचित जातीच्या किंवा त्या मतदार संघाच्या विकासाचे मुद्दे विधानसभेत मांडत नाहीत.

## १.७) संशोधनाची व्याप्तीः—

संबंधित प्रबंधाची व्याप्ती महाराष्ट्रातील विधानसभेमध्ये निवडून आलेले आरक्षित जागेवरील उमेदवार यांच्या कार्याच्या, मतदारसंघाचा विकासाच्या फलनिष्पत्ती संदर्भात आहे. याचा सखोल अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्रातील उदगीर, अहमदपूर, खेड यातील २६६ नागरिकांचा समावेश केला आहे. तर केज, धारावी, जत आणि नागपूर (द) इत्यादीचा तेथून निवडून आलेले आमदार त्यांनी केलेले भाषणे याचे विश्लेषण याच्या संदर्भात आहे.

## १.८) पुणे करारः—

१९०९ मध्ये ब्रिटीश पार्लमेंटने ''इंडियन कौन्सिल ॲक्ट'' पास केला. ज्यात स्वतंत्र मतदार संघाची संकल्पना सर्वप्रथम मांडण्यात आली व मुस्लीम आणि शीख यांच्यासाठी स्वतंत्र मतदार संघ देण्यात आले. पुढे १९३२ मध्ये ब्रिटीश पंतप्रधानांनी जातीय निवाडा घोषित केला व त्यानुसार मुस्लिम आणि शीख यांच्याप्रमाणे खिश्चन, युरोपीयन व ॲग्लोइंडियन यांच्यासाठी स्वतंत्र मतदार संघ जाहिर केले त्याचप्रमाणे दलितांसाठी स्वतंत्र मतदार संघ जाहिर केला. तेव्हा म. गांधी उपोषणाला बसले व पुणे करार घडून आला.

डॉ. *बाबासाहेब आंबेडकर दलितांसाठी स्वतंत्र मतदार संघ असावेत* यासाठी प्रयत्नशील होते पण म. गांधी उपोषणाला बसले त्यांच्यामते दलित हा हिंदू धर्माचाच एक भाग आहे जर त्यांना स्वतंत्र मतदार संघ दिले तर हिंदू धर्मातील एकता लोप पावेल शेवटी तडजोड करण्यात

आली व ७८ जागांऐवजी १४८ राखीव जागा दिल्या मात्र दलितांना स्वतंत्र मतदार संघ गमवावे लागले. हा करार इतिहासात, १९३२ चा पुणे करार म्हणून ओळखला जातो. हे आरक्षण धोरण पुढे स्वातंत्र्योत्तर काळात राज्य घटनेत समाविष्ट करून घेतले.

**१.९) संशोधन आराखडा:—**

प्रस्तुत प्रबंधाचा आराखडा पुढील प्रकरणामध्ये विभागलेला आहे.

**प्रकरण पहिले:— प्रस्तावना**

या प्रकरणात अभ्यासविषय निवडण्याचा हेतू, उद्दिष्टये, गृहितके, संशोधणाची व्याप्ती, संशोधणाचे महत्व इत्यादींचा विश्लेषणात्मक आढावा घेतला आहे. तर संशोधन पध्दती आणि संशोधण आराखडा याचा सारांशपणे आढावा घेतला आहे.

**प्रकरण दुसरे:— राजकीय आरक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी व साहित्य पुनर्विलोकन**

**२.१) राजकीय आरक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी**

**२.१.१.स्वातंत्र्यपुर्व कालखंड:—**

प्रकरणाच्या या भागामध्ये राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आरक्षण विषयक कार्याचा आढावा घेतला.

### २.१.२. स्वातंत्र्योत्तर कालखंड:—

या भागामध्ये पंडीत नेहरूंनी स्वीकारलेली राज्याची लोककल्याणकारी भूमिका आणि आरक्षणाचे धोरण याची चर्चा केली आहे.

### २.१.३. १९९२ च्या नंतरचा कालखंड:—

१९९२ नंतर जेव्हा भारतात खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण धोरणाचा स्वीकार केला तेव्हा राज्याची लोककल्याणकारी ही भूमिका दूर झाली व याचा आरक्षण व्यवस्थेवर कसा परिणाम झाला याचा आढावा या भागात घेतला आहे.

## २.२) संशोधन पुनर्विलोकन:—

प्रकरणाच्या या भागामध्ये आरक्षण या विषयावर झालेले संशोधन कार्य, संदर्भ ग्रंथ, मासिके इत्यादीचा आढावा घेण्यात आलेला आहे. ॲलिस्टर मॅकमिलन, इष्टर डफको,आणि कांशिराम या विचारवंतांनीच केवळ राजकीय आरक्षण ही वेगळी संकल्पना म्हणुन मांडले आहे. कांशिराम त्याचा 'चमचा युग' या पुस्तकामध्ये राजकीय आरक्षणावर टिका करतात तर इतर सर्व विचारवंत राजकीय आरक्षणच्या बाजूने विचार मांडतांना दिसतात. आनंद तेलतुंबडे त्यांच्या *In defence Prakash Ambedkar* या लेखामध्ये राजकीय आरक्षणावर टिका करतांना दिसतात म्हणुन मी सुध्दा या प्रबंधामध्ये राजकीय आरक्षणाची जमेची बाजू आणि उणिवा याचा आढावा घेत आहे.

याच प्रकरणाचा भाग म्हणून पुण्यातील दलित विचारवंत विलास वाघ यांची ही मुलाखत घेतली आहे व वेगवेगळया साहित्याचा आढावा घेतला आहे.

**प्रकरण तिसरे:— संशोधन पध्दती**

३.१. नमुना निवड पध्दती

३.२. प्राथमिक साधन सामुग्री

३.३. दुय्यम साधने

३.४. संशोधणामध्ये सामाविष्ट असलेल्या मतदार संघाची ओळख.

**प्रकरण चौथे:— जाती व्यवस्थेचा अर्थ आणि उगम व राजकीय आरक्षणाची सैध्दांतिक मांडणी**

**४.१. जाती व्यवस्थेचा अर्थ आणि उगम :—**

राजकीय आरक्षणाची सैध्दांतिक मांडणी करण्यासाठी जाती व्यवस्थेचा अर्थ आणि उगम जानुन घेणे महत्वाचे आहे. म्हणुन बाबासाहेब आंबेडकर, इरावती कर्वे, एम. एन. श्रीनिवास, वगैरे. विचारवंतानी जाती व्यवस्थेच्या केलेल्या मांडणीचा अभ्यास प्रकरणाच्या या भागात केला आहे.

**४.२. सैध्दांतिक मांडणी**

या प्रकरणामध्ये राजकीय आरक्षणाच्या संकल्पनेच्या विकासामध्ये कोणकोणत्या सिध्दांताचे योगदान राहिले याचा आढावा घेण्यात आला आहे.

४.२.१) मार्क्सवादी सिध्दांत:—

४.२.२) उदारमतवादी सिध्दांत:—

४.२.३) आरक्षणाचा समाजशास्त्रीय सिध्दांत:—

**प्रकरण. पाचवे .— तथ्य संकलणाचे विश्लेषण.**

भाग १) दलितांची सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि शैक्षणिक स्थिती:

१. कुटुंबाचा शिक्षण स्तर

२. दलितांचे सरकारी नोकरी व खाजगी नोकरी मधील स्थान

३. दलितांकडे असलेले उत्पादनाची साधने

४. दलितांच्या मालकीची शेतजमीन

५. दलितांचे वार्षिक उत्पन्नाचे प्रमाण

६. दलितांचे कौटुंबिक शेतमजूरीचे प्रमाण

७. दलितांच्या राजकीय विकासाचे प्रमाण

८. दलितांचे राजकीय आरक्षण विषयक मते

९. दलितांचे स्वतंत्र मतदार संघ विषयक अभिप्राय

या भागातील वरील सर्व मुद्यांचे विश्लेषण केले आहे व आज दलितांची काय परिस्थिती आहे यांची मांडणी केली आहे.

भाग २) उद्दिष्टाची परिपूर्तता

भाग ३) गृहितके तपासणी

भाग ४) सामाजिक आरक्षण आणि खाजगी क्षेत्रातील आरक्षण

भाग ५) राजकीय आरक्षणाबाबत विविध दृष्टिकोन

या प्रकरणामध्ये प्रामुख्याने आय.बी.एन. लोकमत, ई.टी.व्ही. मराठी, एन.डी.टी.व्ही. या प्रकारच्या प्रसारमाध्यमावरती आरक्षण विषय या प्रसारीत झालेली प्रसारणे संकलित केले आहे व त्याचे विश्लेषण केले आहे.

भाग ६) १९९९ आणि २००४ या निवडणूकीत निवडून आलेल्या केज, धारावी, जत आणि नागपूर (उ) मधील आमदारांनी विधानसभेत केलेल्य भाषणांचा आढावा:— या भागात खरोखर राखीव जागेवरून निवडून आलेले आमदार अनुसूचित जातीसाठी त्यांच्या विकासासाठी प्रयत्न करतात का? याचा आढावा घेतला आहे.

**प्रकरण सहावे:— निष्कर्ष**

या प्रकरणामध्ये प्राथमिक व दुय्यम साधनांच्या आधारे निघालेल्या निष्कर्षाचा आढावा घेतला आहे.